दिनांक : ११ .०४ .२०२२

# फिनिक्स स्कूल वार्षिक अहवाल २०२१ - २०२२

प्रिझम फौंडेशनचे संस्थापक विश्वस्त व विद्यमान खजिनदार श्री . यशवंतराव पटवर्धन यांचे दि .१४ डिसेंबर २०२१ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले . फिनिक्स परिवाराकडून सरांना भावपूर्ण श्रध्दांजली .
दि .१६ डिसेंबर २०२१ रोजी त्यांना श्रध्दांजली वहाण्यासाठी शाळेत सभा आयोजित केली होती .

यावर्षी शाळेत १० नविन ॲडमिशन झाल्या असून एकूण विद्यार्थी संख्या ७८ आहे .
शाळेत मुख्याध्यापिका व १२ शिक्षक १ ऑनररी शिक्षक व ४ मावश्या कार्यरत आहेत .

यावर्षी सुध्दा करोनाचा प्रादुर्भाव कामी न झाल्याने शाळा online सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला . त्याप्रमाणे पालकांना सूचना देऊन दि . १४ जून २०२१ पासून शाळा online सुरू झाली . मागील वर्षा प्रमाणेच ४ विद्यार्थी व शिक्षक असे गट बनवून WhatsApp video call च्या माध्यमातून तास घेतले जात आहेत . यावर्षी प्रत्येक तास ४० मिनिटांचा करण्यात आला .

यावर्षी Level IV ( English and Marathi ) या वर्गातील मुले पुढील वर्गात गेली व त्या वर्गात दोन्ही माध्यमे मिळून ३ नवीन Admission झाली नसल्याने ते एकत्र होते . तसेच NIOS मधील सर्व विद्यार्थी परिक्षा पास झाले आहेत व नवीन Admission झाली नसल्याने तो वर्ग यावर्षी नाही .

- Result
  - NIOS Results –
    मे २०२१ मध्ये मध्ये NIOS साठी ४ विद्यार्थ्यांनी form भरले होते . प्रत्यक्षात परिक्षा न होता internal marks वर result लागला . सर्व विद्यार्थी सर्व विषयात पास झाले आहेत .

    (1)IshanModak ( 2)Akshay Joshi (3) AsthaPandhare (4) Suyag Gokuldas
  - Hindi Rashtrabhasha -
    ऑक्टोबर २०२१ रोजी शाळेत हिंदी राष्ट्रभाषा प्राथमिक परिक्षा एकूण १५ विद्यार्थ्यांनी दिली . १ -प्रथम श्रेणी, २ - व्दितीय श्रेणी व १० - तृतीय श्रेणी असे १३ विद्यार्थी पास झाले आहेत .

Maharashtra State Board Open School - Vth & VIIIth Standard

- जानेवारी २०२२ मध्ये इ . ५ वी मराठी माध्यमातून १२ व इंग्रजी माध्यमातून ५ विद्यार्थी व इ .८ वी मराठी माध्यमातून ८ व इंग्रजी माध्यमातून ५ विद्यार्थी परिक्षेस बसले होते . सर्व विद्यार्थी परिक्षा उत्तीर्ण झाले आहेत . यावर्षी मार्क न देता Grades देण्यात आल्या आहेत .
- दि . ०१ फेब्रवारी ते दि . २८ फोब्रुवारी २०२२ याकालवधीत ओपन स्कूल इ . ५ वी व इ .८ वी रजिस्ट्रेशन सुरू होणार आहे याची नोटीस पालकांना पाठवून रजिस्ट्रेशन करण्यास सांगण्यात आले . या संदर्भात मानसी लांजेकर व उषा अंभोरे या शिक्षिका ओपन बोर्ड ऑफिसमध्ये जावून संवंधित अधिका-यांना शाळेचे पत्र व माहिती देवून आल्या आहेत .

अभ्यासक्रम

- Pre-voc करता यावर्षी पासून 'Life Skills' हा नविन विषय सूरू करण्यात आहे.

ISO

- दि. २४.०८.२०२१ रोजी संचालिका हर्षा मुळे यांनी Internal Audit घेतले.
- दि.१९.११.२०२१ रोजी Surveillance Audit online झाले.
- दि. २२.०२.२०२२ रोजी संचालिका हर्षा मुळे यांनी Internal Audit घेतले.

सातत्याने चालणारे उपक्रम

- दरवर्षी प्रमाणे दि. ०१ जून २०२१ रोजी वर्धापन दिन साजरा करण्यात आला. ट्रस्टी, मुख्याध्यापिका व फिनिक्स शाळेचे सर्व शिक्षक हजर होते.
- दि. २१ जून २०२१ रोजी योगा दिना निमित्त शिक्षिकांनी काही योगासने केली त्याचे फोटो व महिती विद्यार्थ्या ंना पाठविण्यात आली होती. काही शिक्षिकांनी प्रत्यक्ष तासाला योगासने करून घेतली.
- पालखी सोहळा नेहमी प्रमाणे विद्यार्थ्यांना अनुभवता यावा यासाठी प्रिझम मधील सर्व शिक्षक, मावशी व काका यांनी दि. १२ जून रोजी शाळेत येवून संपूर्ण कार्यक्रम प्रत्यक्ष केला, त्याचे शुटिंग करून त्याचा व्हिडीओ तयार करण्यात आला. त्याची YouTube link बनवून दि. ०२.०७.२०२१ रोजी विद्यार्थ्यांना पाठविण्यात आली होती.
- दि. २३.०७.२०२१ रोजी गुरूपौणिमा साजरी करण्यात आली. त्यानिमित्ताने L III श्लोक म्हणणे, L II B पूजेची तयारी करून पूजा करणे, L II A गुरू शिष्याची गोष्ट सांगणे, L I गुरू कसा असावा याविषयावर माहिती लिहीणे. Pre-voc स्व:तच्या गुरू बद्दल माहिती सांगणे. विद्यार्थ्यांना हे विषय देण्यात आले होते.
- दि. ३१.०७.२०२१ रोजी राजेश्वरी कुलकर्णी यांनी टिळक पुण्यतिथी निमित्त शाळेत येऊन video बनवला. यामध्ये त्यांनी लोकमान्य टिळकांबद्दल माहिती दिली. सर्व मुलांना हा video दि. ०२.०८.२०२१ रोजी पाठविण्यात आला.
- दि. १५.०८.२०२१ रोजी स्वातं>य दिना निमित्त संस्थेत झेंडावंदन करण्यात आले. यावेळी ट्रस्टी व सर्व शिक्षक शाळेत उपस्थित होते.
- दि. ३०.०८.२०२१ रोजी दहीहंडीचा कार्यकम ऑनलाईन करण्यात आला. शिक्षकांनी प्रसाद कसा करायचा याचा video करून पाठविण्यात आला होता. वेगवेगळया level च्या विद्यार्थ्यांना वेगवेगळया activity दिल्या होत्या त्याचे त्यानी फोटो व video पाठवले. प्रतिभा कुलकर्णी यांनी Pre Voc च्या मूलांकडून प्रसाद करून घेतला. सर्व मुलांचा प्रतिसाद छान होता.
- दि. १३.०८.२०२१ रोजी मराठी कविता पाठांतर स्पर्धा घेण्यात आल्या. मराठी विषयाच्या शिक्षकांनी नेमून दिलेल्या कविता विदयार्थांनी पाठ केल्या व त्याचे video करून पाठविले. हे video परिक्षकांना दाखवले व नंबर काढण्यात आले. परिक्षक म्हणून स्वाती सगम यांनी काम पाहिले.
- दि. २३.०८.२०२१ रोजी craft competition घेण्यात आली. वेगवेगळया level ना गणपती decoration साठी वापरता येतील अशा वस्तू बनविण्यास सांगण्यात आले होते. परिक्षक म्हणून निता परांजपे यांनी काम पाहिले.
- दि. २०.०८.२०२१ रोजी safety drill घेण्यात आले.
- जून २०२१ पासून Reading Project हा उपक्रम राबवित आहोत. यात विद्यार्थ्यांची खूप छान प्रगती दिसून येत आहे.
- यावर्षी कै. कमलाबाई गोडबोले आंतरशालेय कविता पाठांतर स्पर्धा ऑनलाईन घेण्यात आली. फिनिक्स शाळा धरून ७ शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. शाळेतील विद्यार्थी प्रत्येक गटात ३ असा सहभाग घेतला होता. दि. २४ सप्टेंबर २०२१ रोजी मा. शिल्पा घोगरे या परिक्षक व पाहुण्या म्हणून आल्या होत्या. प्रत्येक गटात ३ बक्षिसे काढण्यात आली. दि.३० सप्टेंबर २०२१ रोजी वरील कार्यक्रमाची ची YouTube link upload करण्यात आली आहे.

- हिंदी दिना निमित्त कहानी पाठांतर स्पर्धा घेण्यात आली होती . या स्पर्धेचे परिक्षण संचालिका हर्षा मुळे मॅडम यांनी करून नंबर काढले .
- दि .२२ .१० .२०२१ रोजी दिवाळी पार्टी ची गुगल लिंक पाठवून दिवाळी साजरी करण्यात आली .
- दि . २४ डिसेंबर २०२१ रोजी सर्व शिक्षकांनी आपआपल्या वर्गात वेगवेगळया पध्दतीने नाताळ पार्टी साजरी केली .
- संस्थेत २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला . यावेळी डॉ . प्राजक्ता कोळपकर यांच्या हस्ते 'तमोहर' वार्षिकांकाचे प्रकाशन करण्यात आले . सर्व स्टाफ उपस्थित होता .
  दि . ३१ जानेवारी २०२२ रोजी सर्व पालकांना २६ जानेवारी ची YouTube link पाठविण्यात आली .
- दि . ३१ .०१ .२०२२ व दि . ०१ .०२ .२०२२ रोजी वाचन दिनानिमित्त सर्व वर्ग शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याकडून वाचन करून घेतले .
- दि . २८ .०२ .२०२२ विज्ञान दिना निमित्त सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमा मध्ये असणारे प्रयोग करण्यास सांगण्यात आले होते . विद्यार्थ्यांचा प्रतिसाद छान होता .
- विद्यार्थ्यांचे ABT सेशन्स विद्या भागवत या घेत आहेत .

गॅदरिंग

- यावर्षी स्नेहसंमेलनाचा विषय 'मेरा भारत महान' निवडल्याप्रमाणे दि . ०३ डिसेबर २०२१ रोजी शुटिंग शाळेत करण्यात आले . यासाठी विद्यार्थ्यांना शाळेत बोलविण्यात आले होते . दि . ११ डिसेंबर २०२१ रोजी स्नेहसंमेलनाची YouTube link upload करण्यात आली . link सर्व विद्यार्थ्यांना पाठविण्यात आली .

परिक्षा

- Unite Test, Terminal Exam या सर्व परिक्षा online घेण्यात आल्या होत्या . विद्यार्थ्यांना मार्क न देता ग्रेड देण्यात आल्या . सर्व परिक्षाचे result online पाठविण्यात आले होते .
- दि . ०६ ते दि . १३ .०४ .२०२२ रोजी वार्षिक परिक्षा घेण्यात आली . ही परिक्षा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष शाळेत येवून दिली . परिक्षेचा निकाल दि . २१ .०४ .२०२२ रोजी देण्यात येणार आहे .

शिक्षक

- दि .०२ ते १२ .०६ .२०२२ याकाळात शिक्षकांनी शाळेत येवून अभ्यासक्रम, विद्यार्थी गट, नवीन पालकांना व विद्यार्थ्यांना भेटणे इ . कामे केली . यावेळी सर्व शिक्षकांसाठी प्रतिभा कुलकर्णी या शिक्षिकेने प्राणायाम व मृणाल बिळगी या शिक्षिकेने Emotional Intelligence याविषयावर लेक्चर घेतले .
- सर्व शिक्षिकांना weekly attendance format देण्यात आला आहे . त्याप्रमाणे शिक्षक दर रविवारी मुख्याध्यापिकांना रिपोर्ट पाठवित आहेत .
- दि . ०२ .०८ .२०२१ पासून सुचेता पावगी, निती परांजपे, उषा अंभोरे या शाळेत सकाळी ७ .४५ ते १ .१५ शाळेत येऊन तास घेऊ लागल्या . तसेच दि .०९ .०८ .२०२१ रोजी पासून प्रमिला पुकळे, नेहा लोणकर, सोनाली नहा शाळेत येऊन online teaching करू लागल्या आहेत . काही शिक्षकांनी घरी राहून शिकवण्याचा पर्याय निवडला आहे . घरी राहून शिकल्यास मिळण-या पगारा बावत कल्पना दिलेली आहे त्यांना मान्य आहे .
- ऑगस्ट, ऑक्टोबर, जानेवारी मधील परिक्षेच्या कालावधी मध्ये सर्व शिक्षिका शाळेत येत होत्या . त्यावळी फाईलींग, अभ्यासक्रम, गॅदरिंगचा विषययावर चर्चा झाली . पुढील अभ्यासक्रम तयार करणे, पेपर तपासणे, फाईल्स् अपडेट करणे, काही पालकांना शाळेत भेटण्यास बोलाविले होते इ . कामे केली .

शिक्षिका राजीनामा

- राजेश्वरी कुलकर्णी व प्रतिभा कुलकर्णी या दोन शिक्षिकांनी त्याच्या वैयक्तिक कारणाने राजीनामा दिला आहे .

नविन शिक्षिका

- दि.०८.११.२०२१ पासून सानिका सुदामे या नविन शिक्षिका रूजू झाल्या आहेत. त्या L II A E या वर्गाला Science and Maths व L II B E या वर्गाला Maths हे विषय शिकवत आहेत.

बाहेरील स्पर्धा

- Vidnyanvahini Organisation National Level elocution competition मध्ये आस्था बिडीकर, रिध्दी चंदानी या विद्यार्थीनींना बक्षिस मिळाले. रोख रक्कम व सर्टिफिकेट असे बक्षिसाचे स्वरूप होते.
- टिळक महाराष्ट्र विद्यापिठा तर्फे टिळक पुण्यतिथी निमित्त ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत 'लोकमान्य टिळकांचे विद्यार्थी जीवन' हा विषय निवडून तन्वी देवधरने तिस-या क्रमांकाचे बक्षिस मिळविले.

पालक सभा

- जुलै मधील परिस्थिती पाहता सर्व शाळेची पहिली पालकसभा एकत्र घेणे शक्य नसल्याने वेगवेगळया वर्गाप्रमाणे पालक सभा घेतल्या गेल्या. शनिवार दि.०३ व दि.१०.०७.२०२१ रोजी पालकसभा घेण्यात आल्या.
- दि. १८ व दि. १९.१०.२०२१ रोजी दुसरी पालक सभा घेण्यात आली.
- दि.०५ व दि.१२.०३.२०२२ रोजी पालक सभा घेण्यात आल्या. पुढील वर्षाचे परिपत्रक देण्यात आले, व यावर्षी घेतली जाणरी वार्षिक परिक्षा ही शाळेत घेतली जाईल असे पालकांना सांगण्यात आले.

कार्यशाळा

- प्रत्येक महिन्याच्या तिस-या शनिवारी संचालिका हर्षा मुळे मुख्य्याध्यापिका, पर्यवेक्षिका, ऑफीस स्टाफ यांचे व्यवस्थापन कौशल्य, वेळेचे महत्व, कामाचे नियोजन इ. विषयवार कार्यशाळा घेतल्या.

बाहेरील कार्यशाळा

- दि. ०८.०२.२०२२ रोजी बालकल्याण संस्थेने आयोजित केलेल्या अक्षर - लेखन (कॅलिग्राफी) या विषयावरील कार्यशाळेस शाळेतील शिक्षिका उषा अंभोरे या सहभागी झाल्या होत्या.
- दि. ०३ व दि. ०४.०३.२०२२ रोजी बालकल्याण संस्थेने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय प्रथमोपचार शिबिरास शाळेतील सेविका पुष्पा जगताप या सहभागी झाल्या होत्या.

बेन्यू टीचर ट्रनिंग / कार्यशाळा

- बेन्यू टीचर ट्रनिंग तर्फे शिक्षिकांसाठी सेशन्स सुरू करण्यात आले आहे.
- वर्षभरात शिक्षकांसाठी 'नाटक कसे बसवावे', Online Technology' 'Dance Therapy' 'संगीतोपचार' याविषयावर कार्यशाळा घेण्यात आल्या.
- वर्षभरात बेन्यू तर्फे ऑनलाईन पालक कार्यशाळा लेव्हल प्रमाणे घेण्याचे ठरल्याप्रमाणे विद्या भागवत यांनी 'रंग बेरंग, शाळेकडून कामाकडे स्थित्यंतर, Motor skills 'बहुआयामी बुद्धिमत्ता' याविषयावर कार्यशाळा घेतल्या.

मिटिंग

- दि. १०.०७.२०२१ रोजी विद्या भागवत यांच्याबरोबर हर्षा मुळे, सुचेता पावगी, मृणालिनी बिळगी यांची व्हीडीओ कॉलव्दारे मिटिंग झाली त्यात असे ठरले की बेन्यू तर्फे जे वाचन project फिनिक्स शाळेत घेतले होते ते सध्या स्थगित केले आहे. शाळा प्रत्यक्ष सुरू होईल त्यावेळी सुरू करण्यात येईल. सध्या शिक्षक तासाला वाचन घेणार आहेत.
- दि. ०३ सप्टेंबर २०२१ रोजी वाय.जी. पटवर्धन सर व रंजनाताई पटवर्धन मिटींगला हजर होते.फिनिक्स व लार्क यांचे Pre- Voc चे वर्ग एकत्र करण्यावर चर्चा झाली. फिनिक्स शाळेत अभ्यासावर भर देणे व Pre-voc मध्ये गेलेल्या विद्यार्थ्यांमध्ये काम करण्यासाठी skill development वर भर देऊन Production साठी तयार करण्याचे ठरले.

- वर्षभर संचालिका हर्षा मुळे यांनी पुढील विषयांवर मिटिंग घेतल्या - शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ चे नियोजन, शिक्षकांनी शाळेतच येवून तास घेणे, अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांचे वर्ग, तासांचे नियोजन, सांस्कृतिक कार्यक्रम, ऑनलाईन गॅदरिंग नियोजन, २६ जानेवारी, वर्षभरात घेतल्या जाणा-या परिक्षाचे नियोजन, विद्यार्थी फी, बजेट, शिक्षिका नियुक्ती साठी मुलाखती, ऑनलाईन कै. कमलबाई गोडबोले पाठांतर स्पर्धा नियोजन, तमोहर लेख व जाहिराती, ISO Audit, यावर्षी तमोहर मासिकाचे प्रकाशन करायचे ठरल्याप्रमाणे संपादकीय व लेख विभागाचे काम विद्या भागवत पाहतील. तर जाहिरात विभागाचे काम सुचेता पावगी व स्वाती सगम पाहतील त्याप्रमाणे कामे करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२० मध्ये फी न भरलेले व ऑनलाईनला जॉईन न झालेल्या विद्यार्थ्यांची लिस्ट बनवून पुढील वर्षीसाठी संपर्क साधणे, एप्रिल मधील वार्षिक परिक्षा शाळेतच घेणे, जून पासून ऑफलाईन शाळा सुरू करणे, फेब्रुवारीमध्ये पुढील वर्षी येणा-या शिक्षकांची यादी तयार करणे, PF संदर्भातील काही मुद्यांवर चर्चा, शैक्षणिक वर्ष २०२२ - २३ चे नियोजन इ. अशा अनेक विषायवर मिटिंग घेण्यात आल्या.
- महिन्याच्या प्रत्येक शनिवारी ॲडमिन स्टाफ बरोबर मिटिंग घेण्याचे ठरल्याप्रमाणे मिटिंग घेत आहोत. या मिटिंग मध्ये शाळेसंबंधी कामकाजाचा आढावा घेण्यात येवून पुढील कामाचा आराखडा तयार केला जातो.
- दि. १७.०३.२०२२ रोजी संचालिका हर्षा मुळे मॅडम यांनी सर्व मावशी व काका बरोबर मिटिंग घेतली. यावेळी सर्व मुख्याध्यापिका उपस्थित होत्या. मिटिंग मध्ये सर्वांना पुढील गोष्टी समजावून सांगण्यात आल्या. (१) जून पासून प्रत्यक्ष शाळा सुरू करणार आहोत. (२) विद्यार्थी शाळेत येण्यास सुरूवात झाल्यावर घ्यायची काळजी.

नविन ॲडमिशन

- ॲडमिशन साठी व्यक्ती भेट देत आहेत.

इतर

- शिक्षक पदासाठी मुलाखती घेण्यात येत आहेत.
- दि. २३.०३.२०२२ रोजी पुढील वर्षा करिता कांचन ड्रेसेस मध्ये स्कूल युनिफॉर्म साठी व सागर फूटवेअर मध्ये शूज साठी संपर्क करण्यात आला आहे.
- दि. २८.०३.२०२२ रोजी बालभारती येथे भेट देवून नविन पुस्तकांबाबत चौकशी करण्यात आली. मे महिन्याच्या शेवटच्या आठवडयात नविन पुस्तके येतील तेव्हा शाळेला कळविण्यात येईल.

सुचेता पावगी
मुख्याध्यापिका
फिनिक्स स्कूल